# आदेश

महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा.राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०१५.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०)

क्रमांकः-मुद्रांक-२०१५/४५७/अनौ.सं.क्र.०९/प्र.क्र.११२/म-१ ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.आयटीपी-२०१३/ (प्र.क्र.- २६५)/ उद्योग-२, दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ अन्वये, महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५ जाहीर केले आहे. त्याअर्थी, आता महाराष्ट्र शासन याद्वारे ,महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, (१९५८ चा अधिनियम क्र. ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याची खात्री पटत असल्याने खालील अनुसूचीतील रकाना (२) मध्ये नमूद केलेल्या माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत घटकांच्या, अनुसूचीतील रकाना (४) मध्ये नमूद केलेल्या पहिल्या संलेखांवर अनुसूचीतील रकाना (३)मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क दिनांक १ जुलै, २०१५ रोजी सुरु होणा-या व दिनांक ३० जून, २०२० रोजी संपणा-या कालावधीसाठी दोन्ही दिवस धरुन खालील शर्तीवर सवलत /माफी देत आहे.

शर्ती :-

१) ज्या कामासाठी मुद्रांक शुल्कातून माफी / सवलत देण्यात आली आहे ती कामे सुरू करण्यात कसूर करणारे किंवा "महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५" मधील कोणत्याही शर्तीचा भंग करणा-या घटकांस जणू काही सुरुवातीपासूनच माफी देण्यात आली नसल्याप्रमाणे मुद्रांक शुल्क व दंड भरण्यास पात्र राहील.

२) या धोरणाअंतर्गत येणा-या उद्योगांना मुद्रांक शुल्कातून माफी देण्यापूर्वी शासनाच्या इतर कोणत्याही धोरण / योजनांतर्गत संबंधित उद्योग घटकांना मुद्रांक शुल्कातून माफी घेतल्याची पडताळणी करणे गरजेचे असल्याने, उद्योग विभागाच्या सक्षम प्राधिका-याकडून माफीबाबत ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असेल.

**स्पष्टीकरण :-** या आदेशाच्या प्रयोजनार्थ :-

(अ) महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५ म्हणजे शासननाने, शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.आयटीपी-२०१३/(प्र.क्र.- २६५)/उद्योग-२, दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ अन्वये, जाहीर केलेले "महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५"

(ब) माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक म्हणजे याकरिता निर्देशित केलेल्या किंवा या प्रयोजनार्थ प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिका-यांनी प्रमाणित केलेला घटक.

(क) अनुसूचीतील रकाना (२) मध्ये नमूद केलेला घटकाचा प्रकार याचा अर्थ "महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५ "अंतर्गत मोडणारा घटक.

**अनुसूची**

| अ.क्र. | प्रकल्प/उद्योग/युनिट प्रकार आणि क्षेत्र | अनुज्ञेय सवलत | संलेखाचे प्रकार व अधिनियमातील अनुसूची-१ मधील अनुच्छेद. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | राज्यातील सी,डी,डी+, ना-उद्योग जिल्हे आणि नक्षलग्रस्त क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक | १००% | तारणगहाण, हडप, तारण, हक्कलेख निक्षेप, (अनु. ६), अभिहस्तांतरणपत्र (अनु. २५), गहाण मालमत्तेवरील अधिक प्रभार (अनु. ३३), भाडेपट्टा (अनु. ३६), गहाणखत (अनु. ४०), आणि प्रतिभूती बंधपत्र (अनु. ५४), |
| २ | अ व ब प्रवर्ग क्षेत्रामधील सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान उद्यानातील, नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक, किंवा विद्यमान घटकांचे विस्तारीकरण यासाठी | १००% | तारणगहाण, हडप, तारण, हक्कलेख निक्षेप, (अनु. ६), अभिहस्तांतरणपत्र (अनु. २५) आणि भाडेपट्टा (अनु. ३६), |
| ३ | अ व ब प्रवर्गक्षेत्रामधील खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील, नवीन व विद्यमान घटकांचे विस्तारित माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा | ७५% | तारणगहाण, हडप, तारण, हक्कलेख निक्षेप विलेख (अनु. ६) अभिहस्तांतरणपत्र (अनु. २५), भाडेपट्टा (अनु. ३६) आणि अभिहस्तांकित भाडेपट्ट्याचे हस्तांतरण (अनु.६०) |

| | | | |
|---|---|---|---|
| | घटक (माहिती तंत्रज्ञान हार्डवेअर व दूरसंचार हार्डवेअर उत्पादन घटकांसह) सेझमधील खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान,माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रातील घटक. | | |
| ४ | अ व ब प्रवर्गक्षेत्रामधील विशेष आर्थिक क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान उद्यानातील, आणि माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रातील नवीन व विद्यमान घटकांचे विस्तारित माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक (माहिती तंत्रज्ञान हार्डवेअर व दूरसंचार हार्डवेअर उत्पादन घटकांसह) आणि अ आणि ब प्रवर्गामधील एसटीपीआयने मान्यता दिलेले नोंदणीकृत माहिती तंत्रज्ञान घटक. | १००% | तारणगहाण, हडप, तारण, हक्कलेख निक्षेप विलेख, (अनु. ६) अभिहस्तांतरणपत्र (अनु. २५), व भाडेपट्टा (अनु. ३६) आणि अभिहस्तांकित भाडेपट्ट्याचे हस्तांतरण (अनु.६०) |
| ५ | माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक | ७५% | संमती व परवानगी करारनामे (अनुज्ञा) (अनु. ३६अ), अभिहस्तांकित भाडेपट्ट्यांचे हस्तांतरण (अनु. ६०), |
| ६ | राज्यातील नोंदणीकृत माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक | ७५% | विलीनिकरण / विभक्त किंवा फेररचना (अनु. २५ (घक) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(ज्योत्स्ना माडेकर )
कक्ष अधिकारी

## Order

Revenue & Forest Department,
Madam Kama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai-32,
Dated:- 31 October, 2015.

Maharashtra Stamp Act. (LX of 1958)

No. Mudrank-2015/457/UOR.NO.09/CR-112/M-1, Whereas Government of Maharashtra, Industries Energy and Labour Department vide Government Resolution, No.ITP-2013/(CR-265)/IND-2 dated 25th August, 2015 declared the IT/ITES Policy 2015, Now therefore in exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958.), (hereinafter referred to as 'the said act') the Government of Maharashtra being satisfied that it is necessary to do so in the public interest hereby reduces or remits the stamp duty, chargeable on the first instrument mentioned in column (4) of the schedule appended in respect of the types of Information Technology Units (IT Units) of Information Technology Enabled Services Units (ITES Units) specified in column (2) thereof to the extent specified in column (3) against them, for the period starting from the 1st July, 2015 and ending on 30th June, 2020, inclusive of both days subject to following conditions namely:-

**Conditions-**

(1) Any Unit failing to start the activities for which the reduction or remission is granted or commits breach of any of the conditions of the Maharashtra IT/ITES Policy,2015 shall be liable to pay the stamp duty and penalty, as if, there was no reduction/ remission from the beginning.

(2) For the units seeking stamp duty exemption under this policy, it will be essential to verify whether the unit under consideration has availed / not availed any stamp duty exemption, under any other Policies of Government of Maharashtra. It will be compulsory to submit No Objection Certificate from the competent Authority of Industries Department in this regard.

**Explanation-** For the purpose of this Order :-

(a) " the Maharashtra IT/ITES Policy, 2015" means the Maharashtra IT/ITES Policy, 2015 declared by the Government, vide the Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No.ITP-2013/C.R.-265/Inds-2, dated the 25th August, 2015.

(b) "IT/ITES unit" means the information Technology Unit (IT Unit) or Information Technology Enabled Services Units (ITES Units) so certified by implementing agency or any other officer authorised by it in this behalf, as such unit;

(c) the words and expression used in column (2) of the schedule appended hereto shall have the meanings assigned to them under " the Maharashtra IT/ITES Policy, 2015"

**SCHEDULE**

| Sr. No. | Type of project/ industry/units and Zone | Extent of Remission | Type of Instruments under Articles of the Schedule I of the Act. |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1. | IT/ITES Units in C, D, D+, No Industry Areas and Naxalism affected areas of the State. | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds {Art-6}, Conveyance ,{Art-25}, Charge on Mortgage Property {Art.33}, Lease {Art-36}, Mortgage Deed {Art-40} and Security Bond on Mortgage Deed {Art-54}. |
| 2. | New IT/ITES Units and expansions of the existing units in public IT parks in A and B areas. | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds {Art-6}, Conveyance {Art-25}, and Lease {Art-36}. |
| 3. | New IT/ITES Units and expansions of the existing units in Private IT parks, (including IT Hardware and Telecom Hardware Manufacturing units), in Private IT parks in SEZs, IT SEZs in A and B areas. | 75% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds {Art-6}, Conveyance {Art-25}, Lease {Art-36}. and Assignment of Lease {Art.60} |
| 4. | New IT/ITES Units and expansions of the existing units in IT parks in SEZs, IT SEZs (including IT Hardware and Telecom Hardware Manufacturing units) in A and B area, and STPI approved registered units in A and B areas. | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, deeds {Art-6}, conveyance {Art-25}, Lease {Art-36}. and Assignment of Lease {Art.-60} |
| 5. | Registered IT/ITES units. | 75% | Leave and License Agreement {Art-36A} and Assignment of Lease {Art. -60} |
| 6. | On Merger, de-merger, and reconstruction of registered IT/ITES units throughout the State. | 75% | Merger, de-merger, and reconstruction.{ (Art-25(da)} |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

( Jyotsna Madekar)
**Desk Officer**